# ग्रामीण महिलाच्या समस्या

डॉ. किशोर उत्तमराव राऊत

समाजशास्त्र विभाग,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**प्रस्तावना (Introduction) :**

भारता संदर्भात विचार करता आदिवासी, ग्रामीण व नागरी असे तीन भाग पाडले जातात.शासन प्रशासन आणि महसुलाच्या दृष्टीनेही त्याचे विभाग पाडणे गरजेचे ठरते. त्याच्या अनुषंगाने ग्रामीण क्षेत्र (Rural Area) महत्त्वाचे ठरते. तेव्हाच त्याच्या विकासाकडे लक्ष देता येते. ग्रामीण क्षेत्र आजही भारतात सर्वाधिक आहे. त्याच्या सर्वांगिण विकासाशिवाय देशाचा खज्या अर्थाने विकास करता येणार नाही. म्हणून भारत हा खेडयाचा देश आहे. तसेच भारत कृषी प्रधान देश असेही म्हटले जाते. या सर्वांचा विचार करतांना ग्रामीण क्षेत्र आणि विशेष स्त्री पुरुष यासर्वांचा विचार करताना त्यांच्या जीवनशौली , राहणीमान त्याचे वर्तन व्यवहार या बाबी पाहणे महत्त्वाचे ठरते. गेल्या कित्येक वर्षापासून आजही ग्रामीण क्षेत्र कायम आहे. अर्थात बरेच परिवर्तन झाले असले तरी ग्रामीणाचा मोठा भाग आहे तसाच आहे. ज्यामुळे ग्रामीण क्षेत्राची ओळख दिसून येते.

या शोध निबंधात ग्रामीण क्षेत्र गावे, स्त्री पुरुष आणि प्रामुख्याने महिलाच्या समस्या, समस्येची कारणे त्याचा दर्जा व भूमिका आणि एकूणच जीवनशौली अभ्यासण्याचा प्रयत्न आहे. ग्रामीण समाजाचा महत्त्वाचा व अर्धा भाग त्याला महिला ज्यांना सोडून ग्रामीण क्षेत्राचा पूर्णाशाने विचार करता येणार नाही त्याशिवाय ग्रामीण महिलाच्या समस्याचे विश्लेषण करता येईल.

**अध्ययनाची उद्देश :**

या अध्ययनात खालील प्रकारच्या उद्देशाचा समावेश करण्यात आला ते खालील प्रमाणे आहेत.

1. ग्रामीण महिलाच्या जीवन शौलीचे अध्ययन करणे.
2. ग्रामीण महिलाच्या समस्या अभ्यासणे.
3. ग्रामीण महिलाच्या समस्याच्या कारणाचे विश्लेषण करणे.
4. ग्रामीण महिलाच्या समस्यावर उपाय सुचविणे.

वरील उद्देशाला अनुसरुन ग्रामीण महिलाच्या विवाहीक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक समस्याचे विश्लेषण केले आहे. दुय्यम तथ्याच्या आधारे महिलाच्या एकूण समस्या, त्याचे कारणे आणि त्यावर काही उपायही सुचविल्या आहेत.

**ग्रामीण महिलांची जीवनशौली :**

ग्रामीण क्षेत्रात महिलाचा विचार करता मुळात ग्रामीण क्षेत्र परंपरागत जीवन पद्धतीचे प्राबल्य असणारा भाग, ज्यामध्ये जातीय-धार्मिक प्रथा, परंपरा , चालीरिती, संकेत , विश्वास, भिन्न-भिन्न प्रकारची आहे. जोडीला सण समारंभ, उत्सव, देवी देवता ह्या सर्व बाबी पाहिल्या तर ग्रामीण जीवनशौलीचे प्रतिबिंब आढळून येते. अर्थात ह्या सर्व बाबी कृषी क्षेत्राशी जवळीक साधणाज्या आहे. ग्रामीणचे जीवन शेती व शेतीशी संबंधीत व्यवसायाशी निगडीत म्हणावे लागते. यामध्ये महिलाचा सहभाग, त्याचा दर्जा व त्यानुसार भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण क्षेत्रातील महिलाही ग्रामीण परंपरागत जीवनशौलीचा अवलंब करणाज्या आहेत. उपास, व्रत, वौकल्प यामध्ये त्या त्याचे जीवन जगत असून जोडीला शेतीशी संबंधीत व्यवसायात त्याचा सक्रीय सहभाग असतो.

ग्रामीण महिला ह्या शेती व्यवसायात पुरुषाच्या बरोबरीने कार्य करताना आढळतात. शेतीमध्ये जवढे माणसे आहेत तेवढे कमीच. कारण माणसाशिवाय शेती करता येत नाही. तंत्रज्ञनाचा पुरवठा वाढला असला तरी ग्रामीण क्षेत्रात माणसे शेतीला लागतात. त्यात महिलाचा सहभाग मोठा असतो. एकीकडे महिलांना कुटुंबाची जबाबदारी

सांभाळतांना दुसऱ्या बाजुला शेती व्यवसायात पुरुषाच्या बरोबरीने कामे करावी लागतात. त्यामुळे त्याचा सहभाग आढळतो. त्यातून त्यांच्या समस्या सुद्धा निर्माण होतात. काही सोडविल्या जातात तर काही त्या पलिकडे असतात. एकूणच ग्रामीण महिलाची जीवनशैली वैशिष्टयपूर्ण असल्याचे म्हणावे लागेल. वर्तमान स्थितीत वरवर महिला सुखी व समाधानी दिसत असल्यातरी अन्याय, अत्याचारात सातत्याने वाढ होतांना आढळते. उदा. उत्तरप्रदेशात 49,262, पश्चिम बंगाल 32,513, महाराष्ट्र 31,388, राजस्थान 27422 तर सर्वात कमी नागालँड मध्ये 105 आहेत. हे सर्व आकडे 2016 चे आहेत. (http://en. wikipedia.org)

## ग्रामीण महिलांच्या समस्या

ग्रामीण क्षेत्राचा विचार करता महिला हा समाजाचा अर्धा भाग असतानाही त्याच्या समस्या बऱ्याच आहेत. या गुन्हांची अनेक प्रकार पाडले जातात. उदा. अपराधी हिंसा यामध्ये बलात्कार, अपहरण, हत्या तर कौटुंबिक हिंसेमध्ये पत्नीला बेदम मारणे , लैंगिक दुरव्यवहार, विधवा व वृद्ध महिलांना त्रास, तर सामाजिक हिंसेमध्ये पत्नी किंवा नववधुला हुंडयासाठी त्रास देणे, संपत्तीमध्ये महिलांचा हक्क नाकारणे इत्यादी (आहुजा 2000 : 239) या प्रकारचे अन्याय अत्याचार आढळून येतात. ग्रामीण महिला संबंधी असणाऱ्या समस्या त्या खालील प्रमाणे आहेत.

### 1) वौयक्तीक समस्या :

ग्रामीण महिला कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पौलताना वौयक्तीक बाबीकडे पूर्णत: दुर्लक्ष होते. उदा. शारीरिक व मानसिक बौद्धीक दृष्टीने त्यांना स्वतंत्र स्थानच उरत नाहीत. परिणामी शरीरावर त्याचा वाईट परिणाम दिसून येतो. कामधंद्याच्या गर्तेतून त्यांना आपल्या जगण्याकडे वेळच देता येत नाही. परिणामी अनेक आजाराचा सामना त्यांना करावा लागतो.

### 2) कौटुंबिक समस्या :

ग्रामीण महिलांना कौटुंबिक जबाबदारी पूर्णत: पौलावी लागते. त्याच्या शिवाय कुटुंबाची कल्पनाही करता येत नाही. उदा. मुलाला जन्म देणे, त्याचे पालनपोषण करणे, त्याच्या व कुटुंबातील इतर सदस्याची काळजी घेणे त्यामुळे त्यांना कौटुंबिक जबाबदारी पाहतांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो.

### 3) आरोग्य विषयक समस्या :

ग्रामीण क्षेत्राचा विचार करता आरोग्यविषयक सोयी सवलती बऱ्याच कमी असल्याचे आढळून येते. महिलांना त्याच्या काम, धंदे व जीवनशौलीमुळे अनेक आजार होतात. कौटुंबिक कामे करतांना स्वत:च्या शरीराकडे फारसे लक्ष दिल्या जात नाही. निट काळजी त्यांना घेता येत नाही. परिणामी आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागते.

### 4) पतीपत्नीचा संघर्ष :

ग्रामीण क्षेत्रात पत्नीला असणारे दुय्यम स्थान त्यातून तिच्या कार्याची अपेक्षा पाहता, पती पत्नी यामध्ये बऱ्याच वेळा संघर्ष होतो. पत्नी पायाखालची वाहान, चुल आणि मूल उपभोगाची वस्तु, त्यांनी कायम पुरुषाच्या मर्जी खाली जगावे ही भावना बऱ्याच ठिकाणी आढळते. लहानमोठया कारणातून पतीपत्नीचे संगडे-भांडणे होतात परिणामी बऱ्याच कुटुंबात संघर्ष असल्याचे दिसून येते.

### 5) दुय्यमत्त्वाची वागणूक :

ग्रामीण क्षेत्रात पुरुषापेक्षा स्त्रीयांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळते. यामध्ये आर्थिक देवाण घेवाण, लग्न कार्य, देवी देवतांचे सण समारंभ, वा उत्सवाच्या वेळी महिलांना दुय्यम महत्त्व दिले जाते. एकूणच निर्णय प्रक्रियेपासून त्यांना दूर ठेवले जाते.

### 6) रुढी, परंपरा व धर्माचा प्रभाव :

ग्रामीण जीवनशौली परंपरागत वाढ रुढी प्रिय असते. त्यंाच्या जीवनावर जातीय व धार्मिकतेचा प्रभाव अधिक असतो. सण, उत्सव, उपास, व्रत, प्रार्थना इत्यादीमध्ये सहभागी असतात. या धार्मिकतेमुळे महिलांना सातत्याने डावलले जाते.

### 7) स्त्रीयाची दयनीय अवस्था :

भारतीय ग्रामीण समुदायातील महिलाची स्थिती अतिशय वाईट असल्याचे दिसून येते. गावातील जातीय धार्मिक रचना पाहता स्त्रीला कायमच दुय्यमत्त्व व कनिष्ठ समजले जाते. उदा. विवाहाचा निर्णय कुटुंबातील पुरुष मंडळी घेतात. मग ते बालविवाह असो. वा संमती विवाह असो. त्याची जबाबदारी पुरुषाची असते. स्त्रीयांना कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत फारसे सहभागी करुन घतले जात नाही. पती कितीही व्यसनी, दारुडया असला तरी पती परमेश्वर म्हणून मुकाटपणे त्याच्या अन्याय अत्याचाराला सहन करावे लागते. समाजातील असणाज्या प्रथा-परंपरा प्रामुख्याने स्त्री जीवनाशी अधिक निगडीत ठेवल्या असून त्यांना सातत्याने दुय्यमत्त्व स्थान देण्याकडे ग्रामीण व्यवस्थेचा कल असतो.

### 8) दर्जा आणि भूमिकेत परिवर्तन :

ग्रामीण समुदायात पती पत्नीचा दर्जा व भूमिका बज्याच अंशी भिन्न असला तरी काळाच्या ओघात त्यात मोठया प्रमाणात परिवर्तन झाल्याचे दिसून येतेे. उदा. वर्तमान काळात महिलांना मिळालेले हक्क व अधिकार जसे शिक्षणाचा अधिकार, महिला शिक्षण घेत असून बाहेर विविध पदावर नोकज्या निमित्ताने कार्य करतात परिणामी तिचा पारंपारिक दर्जा बदलून नवीन दर्जा व भूमिकेचा स्वीकार केला. महिला कितीही शिक्षण घेऊन बाहेर जात असणाज्या तरी पुरुषी मानसिकता आजही म्हणावी तसी बदलली नाही पती पत्नीचे शिक्षण, नोकरी, व्यवसाय याबाबतीत भिन्नता अधिक आढळते. एकूण महिलाच्या दर्जा व भूमिकेच्या परिवर्तनातून अनेक समस्याची निर्मिती होताना आढळते.

### 9) आर्थिक समस्या :

ग्रामीण महिलाना नेहमी पुरुषावर अवलंबून राहावे लागते. मुलांना जन्म देणे, त्याचे पालनपोषण, घराची निगा राखणेे, मनाप्रमाणे नोकरी व व्यवसाय करता येत नाही. परिणाम आर्थिक परावलंबीत्व निर्माण होते. पुरुषाच्या मर्जीवर जगावे लागते. परंतु वर्तमान परिस्थिती पाहता ग्रामीण महिला कामधंद्याच्या निमित्ताने घराबाहेर पडत असून कुटुंबाच्या उदरनिर्वाहामध्ये सहभागी होतात असे असले तरी, आजही महिलांना डावल्याचे प्रकार अधिक आहे.

### 10) विवाहातील अंतर :

ग्रामीण भागात मुलामुलींच्या विवाह वयातील बरेच अंतर आढळते. मुलगा-मुलगी (वधूवर) कायद्यानुसार बालक असतांना विवाह केले जातात. कालांतराने त्यांच्यात मतभेद वाढतात. विचार जुळत नाहीत. मनाची व भावनेची शारीरिक परिपक्वता नसते. अशा अनेक बाबीमुळे बिजोड विवाह आढळतात.

### 11) सासु साज्याचा हस्तक्षेप :

ग्रामीण क्षेत्रात कौटुंबिक पातळ्यावर सासु सासज्याचा हस्तक्षेप सर्वाधिक असतो. मुलाने हे करावे, ते करु नये, असे वागावे, तसे वागू नये अशी अपेक्षा करुन मुलावरील पकड कायम ठेवण्याचा प्रयत्न होतो. एका बाजूला आईवडिल तर दुसज्या बाजुला पत्नी अशा वेळी कोणाची बाजु घ्यावी असा प्रश्न उपस्थित होतो त्यातून संघर्ष निर्माण होतो.

वरील समस्याबरोबर विवाह प्रसंगी हुंडा दिला नाही तर शारीरिक व मानसिक छळ केल्या जातो त्यातून होणाज्या हुंडाबळी सारख्या अनेक समस्या ग्रामीण महिलामध्ये आढळून येतात.

### ग्रामीण महिलाच्या समस्यावरील उपाय :

ग्रामीण महिलाच्या समस्याची तीव्रता लक्षात घेता कायद्याची बरीच तरतूद केली आहे. विधवा विवाह कायदा 1856, सती बंदी कायदा 1829, बालविवाह प्रतिबंधक कायदा 1929, हिंदू विवाह कायदा 1956 , द्विभार्या प्रतिबंधक कायदा 1955, नोंदणी विवाह कायदा 1872 सुधारीत 1954, घटस्फोटाचा कायदा 1955 सुधारीत 1976, पोटगी कायदा 1946, सुधारीत 1956, हुंडा प्रतिबंधक कायदा 1961 सुधारीत 1984, मुलींच्या अनौतिक व्यापारा विरोधी कायदा 1956, दत्त घेण्याचा कायदा 1956, वेशा व्यवसाय प्रतिबंधक कायदा 1956, गर्भपात कायदा 1972, गर्भजल परीक्षण विरोधी कायदा 1988, मुंबई देवदासी संरक्षण कायदा 1934, औद्योगिक व श्रमविषक कायदा 1976, फौजदारी कायदा 1983, कौटुंबिक छळापासून महिलांचे संरक्षक कायदा

1982, तर कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ कायदा 1994 अशा प्रकारचे एक ना अनेक कायदे भारतीय संविधानाने तयार केलेले आहे. या सोबतच खालील उपाय सुचविले जातात.

1. शिक्षणाचा प्रचार प्रसार करावा.
2. स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करावा
3. स्त्रियांना हक्क व अधिकाराची जाणीव करुन द्यावी.
4. बालविवाह बंदी आणावी व तसे करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी.
5. स्त्रियांना रोजगार व स्वयंरोजगाराची निर्मिती करुन द्यावी.
6. कुटीर व लघु उद्योगाचा प्रोत्साहन द्यावे.
7. महिलांना सक्षम बनविणे.
8. पूर्णपणे दारु बंदी करावी.
9. महिलांना स्वयंरक्षणाचे धडे द्यावे.
10. कायद्याची कठोर अंमलबजाणी करावी.
11. महिलांचे स्वतंत्र पथक नियुक्त करावे.
12. पोलीस न्यायालयाने प्रामाणिकपणे नि:पक्षपातीपणे भूमिका निभावी.
13. महिलांवर अन्याय अत्याचार करणाऱ्यास सरसकट फाशीच्या शिक्षेची तरतूद असावी.
14. महिला विकासाकरीता कृतीबध्द कार्यक्रम करावा.

## सारांश :

ग्रामीण महिलाच्या समस्या बऱ्याच आढळतात. ज्यामुळे ग्रामीण महिलाचे जीवनच उध्वस्त झाल्याचे दिसून येते. चुल आणि मूल एवढयावरच त्यांनी राहावे पुरुष सांगले त्या प्रमाणे वागावे. कुटुंबायाची सेवा करावी , मुकाटपणे जगावे अशा प्रकारची स्थिती ग्रामीण भागात सर्रासपणे आढळतात. महिलावर होणारे अन्याय, अत्याचार महिलाच्या समस्या पाहता त्यावर कायदेशीर उपायही होताना दिसतात. महिलावर होणाऱ्या अन्यायाबाबत तिला जाब विचारला जातो. आरोपी मात्र मोकळे राहतात एकूणच भारतीय संविधाना द्वारा सुरक्षा कवच आणि कडक कायदे असले तरी आजही महिलांवरील अन्याय अत्याचार संपले नाहीत हा मोठा प्रश्न सर्वांन समोर आहे. याकरीता कुटुंबा पासून सर्वच घटकांनी कार्य करण्याची आवश्यकता आहे.

## संदर्भ :


1. आहुजा राम (2000) सामाजिक समस्याऐ , रावत पब्लिकेशन्स, जयपूर
2. साखरे सिमा (1997) , स्त्रीवादी चळवळीच्या प्रणेत्या, सीमा प्रकाशन, नागपूर
3. सिंह वी.एन. एवं सिंह जनसंजय (2013) : नारीवाद, रावत पब्लिकेशन्स, जयपूर
4. जाधव नरेन्द्र : बोल महामानवाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे 500 मर्मभेदी भाषणे खंड, ग्रंथाली, प्रकाशन, मुंबई.
5. http://www.in.wikipedia.com.